# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१४ ऑक्टेंबर, २०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


# वाहतुक अधिसुचना

दिनांक १५/१०/२०१९ व १६/१०/२०१९ रोजी **धम्मचक्र अनुप्रवर्तन सोहळा साजरा** करण्यात येत असुन सदर सोहळ्यास जिल्हयातील व जिल्ह्याबाहेरील अनुयायी मोठया संख्येने दीक्षाभूमी मैदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर येथे येत असतात. यादरम्यान वाहतुक व रहदारीचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधीत रहावी म्हणुन पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचे मार्गदर्शनात चंद्रपूर शहरातून दीक्षाभूमी परिसराकडे जाणाऱ्या रहदारीचा मार्ग दिनांक १५/१०/२०१९ चे सकाळी ०८:०० वाजता पासुन दिनांक १७/१०/२०१९ चे सकाळी ०८:०० वाजता पर्यतच्या कालावधीसाठी सर्व प्रकारच्या वाहनांची रहदारी खालील प्रमाणे वळविण्याचे तसेच जडवाहनास प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

➢ दिनांक १५/१०/२०१९ चे सकाळी ०८:०० वाजता पासुन दिनांक १७/१०/२०१९ चे सकाळी ०८:०० वाजता पर्यत नागपूरकडून चंद्रपूरकडे येणारी जड वाहने हॉटेल कुंदन प्लाझा पलीकडेच थांबुन राहतील.

➢ मुलकडून नागपूरकडे जाणारी जड वाहने एम. ई. एल. नाका चौक येथेच थांबतील.

➢ बल्लारशा कडून नागपूरकडे जाणारी जड वाहने बंगाली कॅम्प पलीकडे डि. आर. सी. बंकर, बायपास रोड येथेच थांबुन राहतील. दीक्षाभूमी मार्गावरील अनुयायांची गर्दी पाहुन आवश्यकतेनुसार सदर प्रवेश बंदीमध्ये शिथीलता देण्यात येईल.

## <u>शहरातील दुचाकी व चारचाकी (हलकी) वाहनाकरीता रहदारी व्यवस्था.</u>

➢ जुना वरोरा नाका चौक ते आंबेडकर महाविद्यालय–मित्र नगर चौक– टि. बी. दवाखाना पर्यंतचा मार्ग सर्व प्रकारचे वाहनाकरीता (सायकल सहीत) बंद करण्यात येत आहे.

➢ पाण्याची टाकी –विश्रामगृह–जुना वरोरा नाका हा मार्ग सर्व प्रकारचे वाहनाकरीता (सायकल सहीत) दोन्ही बाजुने बंद करण्यात येत आहे. करीता नागपूरकडून शहराकडे जाणारी वाहने (जड वाहने वगळुन) वरोरा नाका–उड्डान पुल–सिध्दार्थ हॉटेल–बस स्टॅड–प्रियदर्शनी चौक मार्गे शहराकडे जातील.

➢ रामनगर, मित्र नगर,आकाशवाणी, स्नेहनगर, वडगाव परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी पाण्याची टाकी– दवा बाजार– संत केवलराम चौक– दाताळा रोड मार्गे पर्यायी रस्त्याने आपली वाहने (जड वाहने वगळुन) घेवुन जावीत. त्याचप्रमाणे जटपूरा गेट कडून रामनगर मार्गे जुना वरोरा नाकाकडे जाणाऱ्या वाहन चालकांनी आपली वाहने पाण्याची टाकी–प्रियदर्शनी चौक–बस स्टॅड–सिध्दार्थ हॉटेल–उड्डान पुल मार्गे नागपूरकडे जातील.

➢ दीक्षाभूमी येथे जाणाऱ्या बौध्द बांधवाची गर्दी पाहता **पाण्याची टाकी चौक– <u>जुना वरोरा नाका, आय.टी.आय. कॉर्नर, पत्रकार भवन, उड्डान पुल व दीक्षाभूमी परिसर</u>** <u>तसेच</u> **वरोरा नाका चौक –संत केवळराम चौक** व **मित्रनगर चौक ते जिल्हा स्टेडीयम** पर्यत **<u>‘‘नो पार्कीग व नो हॉकर्स झोन’’</u>** म्हणुन घोषीत करण्यात येत आहे. त्यामुळे निर्देशित काळात सदर परिसरात कोणतेही वाहने, हॉकर्स लावण्यात येवू नये.

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)


➢ दीक्षाभूमी ते संत केवलराम चौक या दरम्यान राहण्याऱ्या रहिवाशांनी आपली वाहने रस्त्याच्या बाजुला उभी न करता घोषीत करण्यात आलेल्या पार्किंगमध्ये ठेवण्यात यावीत.

➢ आयटीआय कॉलेज ते जिल्हा स्टेडीयम पर्यंत तसेच वरोरा नाका दर्ग्याच्या उजव्या बाजुने जाणारा रस्ता—पुठ्ठेवार हॉस्पीटल— बुक्कावार हॉस्पीटल—वरोरा नाका ते पिंक प्लॅनेट पर्यंत नो—पार्किंग झोन व नो— हॅकर्स झोन म्हणुन घोषीत करण्यात यावा.

**<u>दिक्षाभूमी सोहळयास येणाऱ्या नागरिकांकरीता वाहन पार्कींग स्थळ</u>.**

**१. नागपूर रोडने दिक्षाभूमीकडे योणाऱ्या अनुयायांनी त्यांची दुचाकी व चारचाकी वाहने**

१) शकुंतला लॉन

२) जनता कॉलेज समोरील पटांगण

३) वरोरा नाका पिंक प्लनेटच्या उजव्या बाजुला श्री भटीया यांच्या मोकळया जागेत पार्क करतील.

**२. शहरातुन दीक्षाभूमीकडे येणारी वाहने**

१) सेंट मायकल स्कुल मैदान

२) सिंधी पंचायत भवन

या ठिकाणी पार्क करावीत.

**३. वडगांव, आकाशवानी व लगतच्या परिसरातुन दीक्षा भूमीकडे येणारी वाहने—**

१) लोकमाण्य टिळक हायस्कुल (जिल्हा स्टेडीयमच्या मागे)

२) श्री हसानी यांच्या मालकीच्या जागेत (मित्र नगर)

या ठिकाणी पार्क करावीत.

**४. मुल रोड, बंगाली कॅम्प, तुकूम या परिसरातुन येणाऱ्या अनुयायांनी आपली वाहने—**

१) कृषी भवन जवळील मैदान/ ट्रॅव्हल्स स्टॅन्ड येथे पार्क करावीत.

तरी धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन सोहळयामध्ये सहभागी सर्व बौध्द बांधव/ अनुयायी व जनतेने वरील वाहतुक व्यवस्थेचा वापर करून घोषीत पार्कींग व्यवस्थेमध्येच आपली वाहने ठेवून वाहतुक व्यवस्थेचे पालन करावे. शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यास पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

---